नियमित फौजदारी खटला नं.११८/२०२२
निशाणी- १३

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ चा जबाब.

मी शपथेवर कथन करतो की,
माझे नांवः- संगिता उल्हास ठोकळ
वयः- ५० वर्षे, धंदाः- घरकाम.
राहणार- निंबळक, ता.जि. अहमदनगर.

सरतपास शपथेवर अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील
श्री. ए. एस. यादव यांचेकडूनः-

१. आरोपी माझे जावई आहे. माझ्या मुलीचे लग्न सन २०१२ मध्ये आरोपीसोबत झाले. लग्न होताना आरोपीने त्याचे शिक्षण कॉम्प्युटर इंजिनियर असे सांगितले होते. लॉकडाऊनमध्ये मुलीला व जावयाला मी माझ्याकडे आणले होते. त्यांना दोन मुले आहेत. दिनांक ०६/०९/२०२१ रोजी रात्री ७.३० वाजता मी व माझी मुलगी आरोपीच्या आजीच्या घरी लक्ष्मीनगर, तपोवन येथे नातवंडांना आणण्यासाठी गेलो होतो. त्याच्या घरी आम्ही गेलो असता आरोपी व त्याची आई तेथे हजर होते. त्यांनी आम्हाला शिव्या देण्यास सुरूवात केली. आरोपी दारू पिलेला होता. आरोपी आईवरून शिवीगाळ करत होता. त्याने माझे केस धरून खाली पाडले. मला व माझ्या मुलीला त्याने लोखंडी रॉडने डोक्यात मारले. आम्ही दोघीही रक्तभंबाळ झालो होतो. तेथून आम्ही पोलीस स्टेशनला गेलो. पोलीसांनी आम्हाला उपचारासाठी यादी दिली. आम्ही सिव्हील हॉस्पीटलला जावून उपचार घेतले व तेथून आल्यानंतर पोलीसांनी आमची फिर्याद नोंदवून घेतली. त्यानंतर आम्ही सागर बोरूडे यांच्या नागापूर येथील हॉस्पीटलमध्ये गेलो होतो.

२. माझ्या मुलीने फिर्याद दिली होती. घटना आरोपीच्या आजीच्या घरात घडली होती. शिवीगाळ घरात दिली होती व लोखंडी रॉडने मारहाण घराच्या बाहेर केली होती. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

उलट तपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. आर. पी. शेलोत यांचेकडूनः-

३. माझी मुलगी लग्नानंतर आरोपीच्या घरी नेवासा येथे नांदायला गेली होती. त्यावेळे तेथे तिचे सासु-सासरे, भाया, जाऊ, दिर, ती व आरोपी असे एकत्र राहत होते. त्यावेळी आरोपीचे वडील फॉरेस्ट खात्यात नोकरीस होते. त्यावेळी आरोपी काय करत होते ते मला माहित नाही. काही दिवसांनी माझी मुलगी गरोदर असताना तिच्या कुटुंबातील सर्व लोक उरूळी कांचन, पुणे येथे राहण्यास गेले होते. बाळंतपाणासाठी माझी मुलगी माझ्याकडे आली होती.

४. आरोपीची आजी नगर येथे स्वतःचे घरात राहते. आरोपी पुणे येथे असताना पॅथॉलॉजी लॅबमध्ये काम करत होता. हे म्हणणे खरे नाही की, ते सर्व लोक पुण्यात राहत असताना व तिच्या घरातील ईतर लोकांशी जमत नव्हते. पुणे येथे असताना माझ्या मुलीकडे मोबाईल नव्हता. पहिल्या बाळंतपणानंतर माझी मुलगी माझ्याकडे चार महिने राहिली होती. त्यानंतर आरोपीने तिला पुण्याला नेले. त्यानंतर जवळपास ५ ते ७ वर्ष ती पुणे येथे राहिली. त्यादरम्यान तिला पुण्या दिवस गेले. दुस-या बाळंतपणासाठी तिला नगर येथे आणले होते. दुसरा मुलगा झाल्यानंतर ती पुन्हा दोन-चार महिन्याने पुणे येथे गेली.

५.प्रश्न - पुण्यात राहत असताना दोन मुले झाल्यानंतर लेक जावई नगरला का आले ?

उत्तर - आरोपी काही कामधंदा करत नव्हता. मी पैसे पाठवत होते. तेंव्हा माझ्या मुलीला खायला मिळत होते. आरोपी दारू पिऊन पडत होता. माझ्या मुलीला व तिच्या दोन मुलांना तिच्या सास-याने घराबाहेर काढले होते.

नगरला आल्यानंतर मुलगी व जावई बोल्हेगाव रेणुकानगर येथे भाड्याने खोली घेवून राहत होते. बोल्हेगाव व निंबळक हे अंतर साधारण १ ते १.५ कि.मी. आहे. माझी मुलगी व जावई त्यांच्या आजीला भेटायला जात असायची.

६.प्रश्न -दि.०६/०९/२०२१ पुर्वी आरोपी माझ्या मुलीला त्रास देत होता,

आम्ही पैसे देत होतो अशी काही तक्रार तुम्ही केली होती का ?

उत्तर - माझ्या मुलीने तक्रार करू दिली नव्हती कारण तिला नांदायचे होते. हे म्हणणे खरे आहे की, दि.०६/०९/२०२१ पुर्वी दोन-तीन दिवस आरोपी माझ्या नातवंडांना घेवून त्याच्या आजीकडे गेला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी दोन तीन दिवस आलानाही म्हणून मी व माझी मुलगी दि. ०६/०९/२०२१ रोजी आरोपीच्या आजीच्या घरी चौकशी करण्यासाठी गेला होतो, त्यावेळी आरोपीचे आई-वडील तेथे आले होते. हे म्हणणे खरे आहे की, ते पण नातवंडांना भेटण्यासाठी आले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने त्याच्या मुलांना त्यांच्या आजी-आजोबाकडे भेटायला नेले यात गैर काही नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या काळात माझी मुलगी एम.आय.डी.सी.त कामाला जायची. नगरला आल्यानंतर आरोपीने महिनाभर काम शोधले. त्यांना बँकेत काम लागले. कोणत्या बँकेत काम लागले ते सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दोघे नवरा-बायको कामाला गेल्यानंतर त्यांची मुले माझ्याकडे असायची.

७. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही जेंव्हा अरोपीच्या आजीच्या घरी गेलो त्यावेळेस आरोपी माझ्या मुलीला म्हणाला की आपण दोन दिवस येथे राहू. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मुलांना घेवून निघाला नाही म्हणून मी व माझ्या मुलीने त्याला मारहाण केली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझ्याविरूध्द व माझ्या मुलीविरूध्द तोफखाना पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस पोलीसांनी आम्हाला समज दिली की, पुन्हा मुलांच्या आजीच्या घरी तपोवन येथे जायचे नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी आम्ही दोन्ही मुलांना घेवून रेणुकानगरच्या घरी आलो, परंतु आरोपी आला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, तेंव्हा पासून मुलगी व आरोपी वेगळे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर आम्ही वकिलांचा सल्ला घेतला. माझ्या मुलीने व आरोपीने एकमेकांना नोटीसा दिल्या.

८. आम्ही तपोवनला आरोपीच्या आजीच्या घरी गेलो तेंव्हा अंधार होता.

हे म्हणणे खरे आहे की, घराच्या समोर फर्शी लावलेली आहे आणि त्यासमोर सिमेंटचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, घराच्या समोर नाराळाची झाडे असून घराला कंपाऊंड आहे. हे म्हणणे खरे नाही की, घराच्या कंपाऊंडच्या अॅन्गलला धडकून आम्ही पडलो व आम्हाला जखमा झाल्या. हे म्हणणे खरे नाही की, कंपाऊंड लागून मला व माझ्या मुलीला लागले व खरचटले आणि त्याचा गैरफायदा घेवून आम्ही आरोपीविरूध्द फिर्याद दिली.

९. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आम्हाला आईवरून घाणघाण शिवीगाळ केली, लोखंडी रॉडने मारहाण केली असे काही घडले नाही, याउलट आम्हीच त्याला मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलीला मदत व्हावी म्हणून सदर जबाब देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष,

CHARATE HAMPE MANISHA

Digitally signed by CHARATE HAMPE MANISHA
DN: cn=CHARATE HAMPE MANISHA, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950843, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.07.02 16:17:40 +0530

(श्रीमती मनिषा द. चराटे-हंपे)

मुख्य न्यायदंडाधिकारी

हमदनगर.

दि. १७/०६/२०२५.

अहमदनगर.